# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक ०८/१२/२०२५

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद ९० गोवंश जनावरांना दिले जीवनदान,केळवद पोलसांची कामगिरी

पोलीस स्टेशन केळवद :— **केळवद पोलीसांनी डिसेंबर २०२५ मध्ये गोवंश तस्करांवर कारवाई करत ९० गोवंश जनावरांची सुटका करून त्यांना जिवनदान दिले.**

**कारवाई क्रं १:—** दिनांक ३०/११/२०२५ रोजी केळवद पोलीसांनी गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती वरून, आर.टि.ओ चेक पोस्ट येथे नाकाबंदी करून कंटनेर क्र आर.जे ०९ जि बी ९३६५ यामध्ये कत्तलीकरीता वाहतुक होणाऱ्या ४० ४० गोवंश जनावरांची सुटका केली. **वाहन चालक नाव १) रविशंकर रामसिंग कुशवाह, वय ३० वर्ष, रा. राजपुर देहात, तह. सिकंदरा जि. कानपूर (उ.प्र) आणि त्याचे साथीदार नाव २) शोयब अली मुनीप अली, वय २४ वर्ष, रा.ईस्लामपुर, तह.मालपुरा जि.टोक ( राजस्थान),३) अजय विरेंद्र कुशवाह, वय २४ वर्ष, रा.राजपूर, देहात तह.सिकंदरा जि. कानपूर (उ.प्र) यांच्या वर गुन्हा नोंद करण्यात आला. नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.** कंटनेर क्र आर.जे ०९—जि.बी—९३६५ किंमती ३५,००,०००/— रूपये आणि ४० गोवंश जनावरे किंमती ४,२५,००० /— रूपये आणि ३ ॲन्ड्रॉईड मोबाईल असा एकुण किंमती ३९,७०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

**कारवाई क्रं १ :—** दिनांक ०८/१२/२०२५ रोजी रोजी केळवद पोलीसांनी गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती वरून भागेमाहेरी टोल नाका येथे नाकाबंदी करून एक एल. पी. ट्रेलर क्रमांक आर जे १४ जि ई ६६२३ यामध्ये कत्तलीकरीता वाहतुक होणाऱ्या ५० गोवंश जनावरांची सुटका केली. आरोपी नामे अजरूद्दीन हुसैन बंजारा, वय २८ वर्ष, रा. ईस्लामपुर, तह. मालपुरा जि. टोक ( राजस्थान) आणि चालक असम अली आसण अली, रा. कोटा, राजस्थान यांचे वर गुन्हा नोंद करण्यात आला. **पंचासमक्ष घटनास्थळावरून १) एक एल. पी. ट्रेलर क्रमांक आर जे १४/जि ई ६६२३ किंमती ३५,००,०००/— रूपये २) एकुण ५० गोवंश जनावरे किंमती ६,३४,०००/—रुपये आणि एक मोबाईल असा एकुण ४१,४९,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. दोन्ही कारवाईत सुटका केलेल्या जनावरांना निराश्रीत गौवंश फाउंडशेन, राहुळगाव, ता. काटोल येथे देखभाली करीता दाखल करण्यात आले आहे.**

लोकमत

# कंटेनरमधून जनावरांची अवैध वाहतूक

## तिघांना अटक : केळवद पोलिसांची खुर्सापार शिवारात कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर** : केळवद (ता. सावनेर) पोलिसांच्या पथकाने पांढुर्णा-नागपूर या आंतरराज्यीय महामार्गावरील खुर्सापार शिवारातील आरटीओ चेकपोस्टजवळ केलेल्या कारवाईमध्ये गुरांची अवैध वाहतूक करणारा कंटेनर पकडला. यात तिघांना अटक करण्यात आली असून, एकूण ३९ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई रविवारी (दि. ३०) रात्री करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये कंटेनर चालक रविशंकर रामसिंग कुशवाह (३०, रा. राजपूर देहात, ता.. सिकंदरा, जिल्हा कानपूर, उत्तर प्रदेश), शोयब अली मुनीष अली (२४, रा. इस्लामपूर, ता. मालपुरा जिल्हा टोक, राजस्थान व अजय वीरेंद्र कुशवाह (२४, रा. राजपूर देहात, ता. सिकंदरा, जिल्हा कानपूर, उत्तर प्रदेश) या तिघांचा समावेश आहे. मध्य प्रदेशातून सावनेर मार्गे



याच कंटेनरमध्ये गुरांची अवैध वाहतूक केली जात होती.

नागपूरच्या दिशेने गुरांची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळताच केळवद पोलिसांच्या पथकाने खुर्सापार (ता. सावनेर) शिवारातील आरटीओ चकपोस्टजवळ नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू केली. यात त्यांनी आरजे-०९/जीबी-९३६५ क्रमांकाचा बंद कंटेनर अडवून झडती घेतली.

त्या कंटनेरमध्ये एकूण ४० जनावरे कोंबली असल्याचे निदर्शनास येताच पोलिसांनी चालकाकडील कागदपत्रांची तपासणी केली. ती गुरांची अवैध वाहतूक असल्याचे तसेच सर्व जनावरे कत्तलखान्यात नेली जात असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले. त्यामुळे पोलिसांनी लगेच पंचनामा केला आणि

## ३९.७० लाखांचा मुद्देमाल जप्त

या कारवाईत केळवद पोलिसांनी एकूण ३९ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. यात ३५ लाख रुपयांचा कंटेनर, ४ लाख २५ हजार रुपये किमतीची ४० जनावरे आणि ४५ हजार रुपये किमतीच्या तीन मोबाइल फोनचा समावेश आहे. पोलिसांनी या कंटेनरमधील सर्व गुरांना नरखेड तालुक्यातील गोंडेगाव येथील गोशाळेत पाठविण्याची व्यवस्थाही केली.

तिघांना अटक करीत त्यांच्याकडून गुरांसह कंटेनर जप्त केला. याप्रकरणी केळवद पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

लोकमत

# गुरांच्या वाहतुकीचा कंटेनर पकडला



जप्त करण्यात आलेल्या कंटेनरसह कामगिरी बजावणारे केळवद पोलिसांचे पथक.

लोकमत न्यूज नेटवर्क

**५० गुरांसह कंटेनर जप्त : केळवद पोलिसांची कारवाई**

**केळवद :** पोलिसांच्या पथकाने पांढुर्णा-सावनेर महामार्गावरील भागेमाहरी (ता. सावनेर) शिवारात केलेल्या कारवाईमध्ये जनावरांची अवैध वाहतूक करणारा कंटेनर पकडला. यात ५० गुरे आणि कंटेनर असा एकूण ४१ लाख ४९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई मंगळवारी (दि. ९) पहाटे करण्यात आली.

मध्य प्रदेशातून सावनेर मार्गे नागपूरच्या दिशेने गुरांची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळताच केळवद (ता. सावनेर) पोलिसांनी पांढुर्णा-सावनेर महामार्गावरील भागेमाहरी (ता. सावनेर) शिवारात असलेल्या टोल प्लाझा परिसरात नाकेबंदी करून वाहनांची तपासणी सुरू केली. सावनेरच्या दिशेने जात असलेल्या आरजे-१४/जीई-६६२३ क्रमांकाच्या कंटेनर चालकाने समोर पोलिस दिसताच आधीच कंटेनर थांबविली आणि अंधाराचा फायदा घेत कंटेनर सोडून पळ काढला.

पोलिसांनी लगेच त्या कंटेनरची झडती घेतली. त्यात एकूण ५० गुरे कोंबली असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. ती गुरांची अवैध वाहतूक असल्याचे तसेच सर्व जनावरे कत्तलखान्यात नेली जात असल्याचे स्पष्ट होताच पोलिसांनी पंचनामा केला आणि गुरांसह कंटेनर ताब्यात घेतला. या कारवाईत ३५ लाख रुपयांचा कंटेनर ६ लाख ३४ हजार रुपयांची ५० जनावरे आणि १५ हजार रुपयांचा मोबाइल फोन असा एकूण ४१ लाख ४९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करीत क्लीनर अजहरुद्दीन हुसेन बंजारा (३८, रा. इस्लामपुरा, जिल्हा टोक, राजस्थान) यास अटक केली. या सर्व गुरांना राऊळगाव, ता. काटोल येथील गोरक्षणमध्ये पाठविण्याची व्यवस्थाही पोलिसांनी केली. याप्रकरणी केळवद पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. ही कारवाई ठाणेदार आशिषसिंह ठाकूर, सहायक फौजदार सूरज परमार, हवालदार दिनेश काकडे, मंगेश धारापुरे, महेश डंभारे, सुनील झाडे यांच्या पथकाने केली.